

# हितगुज

मतिमंदत्व आणि लैंगिकतेच्या विविध पैलूंचे...

अंक चौथा
एप्रिल - मे २०१८

## या अंकात काय दडलंय...?


- **मतिमंदत्व आणि लैंगिकता**
  प्रशिक्षकांचे प्रशिक्षण -
  प्रातिनिधिक गट चर्चा गोषवारा
- **आठवणीतलं नाटक -**
  नाती गोती - निहार सप्रे
- **आपले अनुभव**
  आमंत्रण देणारे रस्ते - सुजाता लोहकरे
- **माहितीच्या जगात**
  मर्यादांच्या आंगणात वाढताना -
  सुजाता लोहकरे आणि अरुण लोहकरे


हितगुज टीम तर्फे सर्व पालक-शिक्षक आणि कार्यकर्ते यांना प्रेमपूर्वक नमस्कार ! हितगुजचा चौथा अंक आपल्यापर्यंत पोचवत आहोत. अत्ताच्या मार्च महिन्यात तथापि तर्फे 'लैंगिकता आणि अपंगत्व-प्रशिक्षकांचे प्रशिक्षण' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेची सुरुवात एका सर्वांसाठी खुल्या अशा परिसंवादाने झाली. अंधत्व, शारीरिक अपंगत्व, संभाषण आणि श्रवण अक्षमता, बौद्धिक अपंगत्व अशा निरनिराळ्या अपंगत्वाच्या क्षेत्रात काम करत असलेल्या कार्यकर्त्यांनी लैंगिकतेसारख्या तशा दुर्लक्षित पण संवेदनशील मुद्द्यावर आपले मोलाचे अनुभव आणि मतं मांडली. उपस्थितांचा भरभरून प्रतीसाद लाभलेल्या या महत्वाच्या परिसंवादाचा एक गोषवारा तुम्हाला या अंकात वाचायला मिळेल. विशेषतः कोल्हापूरवरून खास या परिसंवादासाठी आलेल्या कार्यकर्त्या, लेखिका सोनाली नवांगुळ यांचे अनुभव आणि मतं अपंगत्वाच्या क्षेत्रात काम करू पाहणाऱ्या प्रत्येकासाठी महत्वाची आहेत.

अंकात या लेखाशिवाय 'नाती गोती' या चाळीस वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर आलेल्या आणि खूप चर्चिल्या गेलेल्या नाटकाचे एक पुनरावलोकनही आपल्या वाचकांसाठी देत आहोत. कदाचित हे नाटक तुमच्यापैकी अनेकांनी पहिले असेल. ज्यांनी हे पहिले नसेल त्यांनी ते आवर्जून पाहावे असे आम्हाला वाटते. यू ट्यूब वर ते संपूर्ण नाटक उपलब्ध आहे.

या कामाच्या निमित्ताने मागे कधी तरी 'मर्यादांच्या अंगणात वाढताना' हे पुस्तक पाहण्यात आले. काही दिवसांपूर्वी या पुस्तकाच्या एक लेखिका सुजाता लोहकरे यांच्याशी बोलणे झाले आणि त्यांच्याकडून पुस्तकातील एक भाग आपल्या अंकासाठी मागून घेतला. त्यांनीही आनंदाने तशी परवानगी दिली. त्यांचे आभार. या अंकात तो भाग आपल्या वाचकांसाठी देत आहोत. पुस्तक जर वाचण्यात आले नसेल तर आवर्जून ते वाचावे. 'माहितीच्या जगात' या आपल्या सदरात पुस्तकाविषयी अधिक माहिती देत आहोत.

सर्वांना नम्र विनंती. अंक आवडला किंवा नाही आवडला तरी आवर्जून कळवा. आपल्या प्रतिसादाच्या प्रतीक्षेत!

**आपले**
**सुषमा, अच्युत**
**आणि तथापि टीम**

## लैंगिकतेवर बोलू काही!




चित्र : सुषमा दुर्वे

# अपंगत्व आणि लैंगिकता - संवादाची गरज आणि कामाची दिशा

**तथापि ट्रस्ट मागील अनेक वर्षे लैंगिकता शिक्षणाच्या क्षेत्रात काम करत आहे. याच कामाचा पुढील भाग म्हणून तथापि 'मतिमंदत्व आणि लैंगिकता' या विषयावर प्रामुख्याने पालक आणि शिक्षक यांच्यासोबत संवादाचे काम करत आहे. लैंगिकतेसारख्या संवेदनशील मुद्द्यावर संवाद साधू शकणारे संवादक राज्याच्या विविध भागात तयार व्हावेत आणि त्यांच्या रूपाने स्थानिक गरजा भागवू शकणारे एक संसाधन तयार व्हावे म्हणून आम्ही प्रयत्न करत आहोत. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून पुण्यात १४ मार्च ते १७ मार्च २०१८ या काळात चार दिवसांचे एक प्रशिक्षण आयोजित केले होते. या प्रशिक्षणाची सुरुवात 'अपंगत्व आणि लैंगिकता - संवादाची गरज आणि कामाची दिशा' या खुल्या परिसंवादाने करण्यात आली होती.**
**परिसंवादामध्ये या क्षेत्रातील विविध प्रतिनिधी उपस्थित होते. सोनाली नवांगुळ- लेखिका आणि कार्यकर्त्या कोल्हापूर, सुनिता कुलकर्णी- शिक्षण तज्ञ, पालक, पुणे, सुनिता लेले- साद संस्था, पुणे, कणिका अगरवाल- विशेष संस्था, मुंबई, दीपिका परखड- निवांत संस्था, पुणे यांनी आपली मते आणि अनुभवांची मांडणी केली. या परिसंवादाचा गोषवारा देत आहोत.**



## गरज आहे स्वतःला मोकळं करत राहण्याची...

**सोनाली नवांगुळ**
लेखिका आणि कार्यकर्त्या, कोल्हापूर

वयाच्या ९ व्या वर्षी अपघात झाल्यानंतर माझ्या कमरेखाली संवेदना नाहीशा झाल्या आणि नैसर्गिक विधींवरील नियंत्रणही राहिले नाही. मी सध्या अशाप्रकारचे आयुष्य जगात आहे की जे कदाचित पुन्हा कधीच दुरुस्त करता येणारं नाही.

सामाजिक संस्थेमध्ये काम करत असतानाही अनेक नकारात्मक अनुभव आले. अपंगत्व हा एकच दबाव नाही तर अशाप्रकारचे कितीतरी दबाव असतात की ज्याच्यामुळे स्वतःला व्यक्त होण्यात प्रचंड अडचण निर्माण होते. आपल्यावर अनेक तऱ्हेचे ताण असतात. त्यामुळे केवळ लैंगिकतेबद्दलच्याच नव्हे तर सगळ्याच भावना एवढया तीव्र का होतात याचा विचार कुठेतरी करायला पाहिजे. प्रत्येकालाच जसं दिसायचं तसं दिसण्याचा आणि व्यक्त होण्याचा हक्क आहे. त्यासाठी वाईटपणा पत्करावा लागला तरी चालेलं. कारण आपण जसे आहोत तसे राहायला शिकणं यासाठी स्वतःला प्रचंड मोकळं करत राहण्याची गरज असते.

आयुष्य जगत असताना महत्वाच्या गोष्टींविषयी माहिती असणं आणि त्याच्या सवयी होणं हा जीवनातील महत्वाचा भाग आहे असं वाटतं. मला जेंव्हा पहिल्यांदा मासिक पाळी आली तेंव्हा प्रश्न पडलेला की, पाळी ही आनंदाची बाब आहे कि दुःखाची? कारण त्यावेळी मला मासिक पाळीबद्दल काहीच सांगितलं गेलेलं नव्हतं आणि काय करायचं हेही माहिती नव्हतं, त्याबद्दल विचारावं इतका मोकळेपणाही दिला जात नाही ना? लैंगिकतेपर्यंत येण्यासाठीचा जो प्रवास आहे त्यातील अडथळे आपण जसजसे कमी करत आणू तसतसे लैंगिकतेविषयी स्वतःच्या आणि समोरच्याशी जुळवून घेण्याच्या काही युक्त्या सापडतील. त्यासाठी प्रत्येकाला बोलावं आणि व्यक्त व्हावं लागणार आहे. माध्यमांतील कोंडी देखील फोडावी लागणार आहे कारण चित्रपटांमध्ये अपंगांबद्दलच्या प्रेरणादायी कहाण्या दाखविलेल्या असतात परंतू सामान्य आयुष्यात असं असू शकत नाही. म्हणूनच आणखी गरज आहे ती, नवीन माध्यमांचा वापर करून बोलते होण्याची.





## लैंगिकता- मानवी गरज

**सुनिता कुलकर्णी**
शिक्षण तज्ञ, पालक, पुणे

कुठल्याही अपंगत्वाबद्दल जरी आपण बोलत असलो तरी लैंगिकता ही एक मानवी गरज म्हणून बघितलं किंवा विचार केला तर कदाचित थोडसं सोपं होईल. लैंगिकतेला व्यक्त करण्याची प्रत्येकाची पद्धत वेगवेगळी असू शकते. प्रत्येक अपंग व्यक्तीची गरज किंवा स्वतःची लैंगिकता समजून घेण्याच्या क्षमता आणि पद्धती वेगवेगळ्या प्रकारच्या असू शकतात. कुणाला दिसत नसेल, कुणाला ऐकू येत नाही किंवा बोलायला त्रास होत असेल. मात्र सर्वजण स्पर्श हे माध्यम वेगवेगळ्या प्रकारे का होईना वापरू शकतात. व्यक्त होण्यासाठी ते महत्वाचंच आहे. परंतु स्पर्श म्हंटलं की खूपच जवळ आल्याची भावना तयार होते आणि त्याच्यातून मनामध्ये अनेक गैरसमज निर्माण होण्याची दाट शक्यता असते. तसेच स्पर्शामागील हेतूसंदर्भात खूप तर्कवितर्कही लावले जाऊ शकतात. म्हणूनच लैंगिकतेकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलण्याची अत्यंत गरज आहे. लैंगिकता म्हटले की बहुतेक वेळेस लोकांना शरीर संबंध (सेक्स) असाच अर्थ लागतो. आणि मग त्यातून अवांछित गर्भधारणा, लैंगिक आजार ई गोष्टी भेडसाऊ लागतात. परंतु लैंगिकतेचा एवढाच मर्यादित अर्थ नाही. प्रेम, जिव्हाळा, स्पर्श, आपुलकी, जवळीकता हे सुद्धा लैंगिक अभिव्यक्तीतीलच निरनिराळे रंग आहेत. अशा सर्व गोष्टींचा आनंद घेण्यापासून आपण मतीमंद किंवा इतर विशेष मुलांना का रोखतो? अपंगत्वामध्येही नेमके कोणते अपंगत्व आहे, त्यानुसार घरात, कामाच्या ठिकाणी व पूर्ण समाजात नेमका काय बदल करावा लागणार आहे, समाजातील नकारात्मकता कशी कमी करता येईल आणि

एकूणच अपंगत्वाचा स्वीकार अधिकाधिक कसा होईल याच्याबद्दलही अधिक विचार करणे आवश्यक आहे.



## स्वमग्नता (autism) आणि लैंगिकता

**सुनिता लेले (पालक)**
साद संस्था, पुणे

आपल्या भारतामध्ये स्वमग्नता स्विकारायला, सरकारने तशी मान्यता द्यायला आणि त्याला या कायद्यामध्ये स्थान घ्यायला ११९५ हे साल उजाडलं. यात आपण इतर देशांपेक्षा किमान १५-२० वर्षे मागे आहोत. स्वमग्न मुलांची लग्न, त्यांच्या लैंगिक गरजा आणि त्याचं शिक्षण या सर्व गोष्टींबाबत आपण समाज म्हणून पटकन संवेदनशील आणि सजग नाही झालो तर आपण अजून १०-१५ वर्षे मागे जाऊ शकतो.

लैंगिकता म्हणजे वयात आलेल्या मुलांविषयी आपण बोलतोय पण लहानपणापासूनच लैंगिकते विषयीचा मोकळेपणा ठेऊन आपल्या मुलांशी तसं बोलतोय का? त्याप्रमाणे त्यांना वाढवतोय का? पालकांना मुलांचे अपंगत्व पूर्णपणे स्विकारणंच खूप अवघड होतं. आपल्या इथे मुलांना जसं आहे तसं व्यक्त होण्याची मोकळीकच नाही आहे. हे महत्वाचे मुद्दे विचारात घ्यायला हवेत. कारण मुलं वयात येत असताना शारीरिक वाढीची लक्षणं दिसायला लागली की, पालक हतबल होतात. खरेतर अपंगत्व किती तीव्र किंवा सौम्य आहे हे पाहणं गरजेचं आहे. शिवाय मुलाची वाढ कशी झाली आहे, कुठल्या गोष्टीची जबाबदारी घेणं मुलाला किती जमतं या सर्व गोष्टी पाहणंही आवश्यक आहे.

स्वमग्नता किंवा कोणत्याही अपंगत्वासह आयुष्य जगणाऱ्या व्यक्तींचे लग्न होऊ शकते पण त्यासाठी लागणारा आधार, दोन्ही कुटुबांची आर्थिक बाजू आणि नात्यातील लवचिकतेसाठी उपयोगी प्रशिक्षण या गोष्टी आवश्यक असतात. विशेष मुला-मुलींच्या लैंगिक गरजा किंवा लैंगिकता शिक्षण हा खूप पुढचा विचार जरी आपण करत असलो तरी, या मुलांना न्याय मिळतोय का? स्वतःच्या आवडीनिवडी जोपासता येतात का? असे मुद्दे देखील लैंगिक शिक्षणाचा भाग असू शकतात. यासाठी समाजानेच थोडंसं प्रगल्भ व्हायला पाहिजे.



## लैंगिक अभिव्यक्ती आणि संघर्ष

**कणिका अगरवाल**
विशेष संस्था, मुंबई

कर्णबधीर असणाऱ्यांनाही लैंगिकता आहे पण समाजाकडून त्यांच्या लैंगिक अभिव्यक्तीसाठी अनेक मर्यादा येत असतात. त्याबरोबर शिक्षण, अर्थार्जना सोबतच जीवनात इतरही संघर्ष असतातच. त्यामुळे पालकांना अशा पाल्यांच्या भविष्याची काळजी असते.

घरातील संवादांमध्ये सहभागी होता येत नसल्याने किंवा कुटुंबातील मंडळी अशा संवादांमध्ये त्यांना सामील करून घेत नसल्याने अनेकदा घराबद्दल एवढी आत्मियता निर्माण झालेली नसते जेवढी शाळेबद्दल असते. कारण शाळेमध्ये सर्व मुलं त्यांच्यासारखीच असल्याने तिथलं वातावरण आणि व्यक्ती आपल्याश्या वाटत असतात. त्यामुळे प्रेम मैत्री आकर्षण सारख्या भावना शाळेतील मित्र, कर्मचारी यांच्याबद्दल अधिक प्रकर्षाने त्यांना जाणवतात. त्यांची लैंगिकता अशा जागा उपलब्ध असतील तर लवकर विकसित होते. आणि ती तितकीच strong असते. त्यांच्यासाठी ही प्रेमाची आणि आपुलकीची भावना असते पण बहुदा पाहणाऱ्यांना ते चुकीचे वाटत असते. यातून अशा भावनांप्रती आणि वर्तनाप्रती अनेकदा एक प्रकारचा नकारात्मक दृष्टीकोन तयार होतो. तो तसा न ठेवता आकर्षण म्हणजे काय आहे? प्रेम, नातेसंबंध, सेक्स अशा मुद्यांना धरून योग्य मार्गदर्शन करता येण गरजेच आहे. त्यातून पुढील अनेक अडचणी टाळता येतील. आपल्याला त्यासाठी अशा विषयांवर चर्चा करणं आवश्यक आहे.




## अंधत्व स्विकारताना..

**दीपिका परखड**
निवांत संस्था, पुणे

मी वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत डोळस आयुष्य जगले. परंतू २०१४ रोजी माझी ७५% दृष्टी गेली. सुरुवातीला यामुळे खूप तणाव आला होता. एक डोळस आयुष्य जगत असताना अचानक आलेल्या अंधत्वामुळे आता माझं कसं होणार? हे स्वीकारता येईल का? असे विचार मनामध्ये यायला लागले होते. परंतू, निवांत संस्थेमध्ये आल्यानंतर इथलं वातावरण आणि या मुलांमधील जिद्द पाहून चांगलं वाटायला लागलं आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

लैंगिकता हा आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातील इतर विषयांइतकाच महत्वाचा भाग आहे. त्यामुळे वयात येणाऱ्या प्रत्येक मुला-मुलीला लैंगिक शिक्षण मिळणे आवश्यक आहे. मी संस्थेत आले त्यावेळी या मुलांच्या लैंगिक शिक्षणाविषयीचा मला प्रश्न पडला होता की, डोळस मुलं आणि अंध मुलं यांच्या लैंगिक शिक्षणात काही फरक आहे का? परंतू नंतर लक्षात आले की, डोळस मुलांप्रमाणे जरी ते स्वतःमध्ये होणारे शारीरिक बदल पाहू शकत नसले तरी ते समजून घेऊ शकतात. स्पर्श हा त्यांच्या आयुष्यातील महत्वाचा भाग आहे कारण त्यांच्या शिक्षणाची, समजून घेण्याची सुरुवातच स्पर्शाच्या माध्यमातून होते.

**शब्दांकन : सुषमा खराडे**

**परिसंवादामध्ये अपंगत्व आणि लैंगिकते संदर्भातील दुर्लक्षित पण अत्यंत महत्वाच्या अशा अनेक मुद्यांवर प्रकाश टाकला गेला. उपस्थितांच्या मनातील प्रश्न, काम करताना येणाऱ्या अडचणी आणि त्यावर काय मार्ग काढता येतील या मुद्यांच्या अनुषंगाने चर्चा झाली. अपंगत्व कुठले का असेना परंतु लैंगिकता अभिव्यक्तीची गरज ही एक मानवी गरज आहे, लैंगिक अधिकार हे इतर कुठल्याही अधिकारा इतकेच महत्वाचे आहेत या मुद्यावर सर्वच वक्त्यांचे एकमत होते. अपंगत्व आणि लैंगिकता या तशा अवघड समजल्या जाणाऱ्या विषयावर आपल्या समाजात अधिक बोलले जाणे गरजेचे आहे, अपंग व्यक्तींसाठी लैंगिकता अभिव्यक्तीच्या दिशेने समाजात अधिक मोकळे वातावरण तयार केले जाणे गरजेचे आहे असे मत प्रकर्षाने पुढे आले. या क्षेत्रामध्ये विविध पातळ्यांवर काम करणाऱ्या व्यक्तींनी असेच एकत्र येऊन कामाची योग्य दिशा ठरवून आपले सकारात्मक योगदान दिले तर 'अपंगत्व आणि लैंगिकता' या संवेदनशील मुद्यावर काम करणे अधिक सोपे होईल या अपेक्षेसह परिसंवादाचा शेवट झाला..**

# नाती गोती

- निहार सप्रे

*The only true disability is the inability to accept and respect differences.*

- Tanya Masse

**मध्यंतरी जयवंत दळवी लिखित कादंबरी, 'ऋणानुबंध' वर आधारित एक चित्रपट आला होता ज्याचं नाव होतं 'कच्चा लिंबू'. त्याआधी याच कादंबरी वर आधारित एक नाटक आलं होतं ज्याचं नाव होतं 'नातीगोती'. या कादंबरीचा आणि चित्रपट किंवा नाटकाचा इथे संदर्भ घेण्यामागचं कारण म्हणजे मानसिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीची आणि त्याच्या कुटुंबाची काय अवस्था होत असेल? हे आपल्याकडे फार कमी वेळा साहित्यातून किंवा चित्रपट, नाटकातून मांडलं जातं आणि तेच या कादंबरीतून व चित्रपटातून आणि नाटकातून मांडण्याचा प्रयत्न केला गेलाय.**

'कच्चा लिंबू' किंवा 'नातीगोती'ची कथा आहे काटदरे कुटुंबाची. श्री व सौ काटदरे हे अत्यंत साधी सामाजिक पार्श्वभूमी असणारं दांपत्य. श्री काटदरे तार ऑफिसमध्ये काम करत असतात तर सौ काटदरे एका प्रायवेट फर्म मध्ये पर्सनल सेक्रेटरी म्हणून काम करत असतात. दोघांचंही उत्पन्न हे साधारण असतं त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थितीही सामान्य असते. त्यांचा मुलगा बच्चू हा मतिमंद असतो. त्यात बच्चू पौगंडावस्थेत असतो त्यामुळे त्याच्या सर्वच गरजा अगदी त्याची लैंगिक गरज देखील व्यक्त व्हायला लागलेली असते त्यामुळे श्री व सौ काटदरेंना स्वतःचं असं आयुष्यच उरलेलं नसतं आणि त्यांचं संपूर्ण आयुष्य, हे त्यांच्या पंधरा वर्षाच्या बच्चूच्या आजूबाजूला फिरत असतं. आणि या सर्वातून श्री व सौ काटदरेंची होणारी फरफट याची कथा म्हणजे कच्चा लिंबू किंवा नातीगोती.

या चित्रपट किंवा नाटकाच्या निमित्ताने, मानसिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीच्या, आणि त्याच्या/तिच्या कुटुंबियांच्या जीवनाबाबत काही गोष्टी इथे मांडाव्याशा वाटतात.

आपल्याकडे बऱ्याचशा मानसिक अपंगत्व असणाऱ्या मुलांच्या पालकांची समजूत असते की मानसिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीच्या लैंगिक गरजा देखील कमी असतात किंवा त्यांना लैंगिक गरजा नसतातच. मानसिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीच्या लैंगिकतेबद्दल तर सोडाच पण सामान्य व्यक्तीच्या लैंगिकतेबद्दलच लोकांची समज इतकी कमी असते की संपूर्ण समाजच लैंगिकता या विषयाकडे दुर्लक्ष करत असतो आणि त्यातून गोष्टी सुटत तर नाहीतच उलट आणखी बिघडण्याचीच शक्यता निर्माण होते. नातीगोती किंवा कच्चा लिंबू मध्ये देखील मध्ये मध्ये असे काही संदर्भ येत राहतात ज्यातून कशा प्रकारे बच्चू त्याच्या आजूबाजूच्या स्त्रियांकडे लैंगिक दृष्ट्या आकर्षित होतो आहे हे आपल्याला लक्षात येतं. एक क्षण तर असा येतो की बच्चू त्याच्या आईकडेच आकर्षित होतो आणि तिच्यावरच जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करतो. ते बघितल्यावर आपल्याला असा प्रश्न पडू शकतो की मग यावर उत्तर काय?

पहिला मुद्दा म्हणजे मुळात लैंगिकता या विषयाबद्दल समाजात जी गुप्तता बाळगली जाते ती काढून टाकणे आणि त्यावर खुलेपणाने बोलणे अतिशय आवश्यक आहे. आणि त्यातही मानसिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीच्या लैंगिकतेबद्दल तर आणखी विशेष दृष्टीकोन ठेवणे, खासकरून पालकांनी, हे अत्यावश्यक आहे. हे तेव्हाच होऊ शकतं जेव्हा वैयक्तिक पातळीवर सुरवात होऊन मग शाळा, कॉलेज आणि सामाजिक स्तरावर या गोष्टींबद्दल योग्य त्या प्रकारे आणि योग्य त्या माध्यमातून माहिती दिली जाऊ लागेल. ते करण्यासाठी पालक, शिक्षक, शाळा, महाविद्यालये, सरकार या सर्वांनीच एकत्र येऊन त्यावर विचार विनिमय करून, योग्य ती पाऊलं उचलावी लागतील आणि समाजसुधारणेचं काम करावं लागेल. दुसरा मुद्दा म्हणजे एकदा का या विषयाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन व्यापक बनला, की त्याबद्दल विशेष ट्रेनिंगचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणात होणं हे गरजेचं आहे. जेणेकरून समाजातील सर्वांनाच त्यांच्या पाल्याच्या गरजा लक्षात घेता येऊ शकतील व त्यांच्याशी योग्य प्रकारे संवाद करता येऊ शकेल.

हे तर झालं पाल्याबद्दल. परंतु बौद्धिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबियांची जी फरफट होत असते त्याबद्दलही बोलणं तितकंच आवश्यक आहे. उदाहरणार्थ कच्चा लिंबू आणि नातीगोती मधल्या श्री व सौ काटदरे यांची जी फरफट होत असते, तशीच फरफट साधारणतः मतिमंद मुलांच्या सर्वच पालकांची होत असेल. आणि ही फरफट आर्थिक सामाजिक पातळीवर तर होत असतेच पण त्याच बरोबर एक महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या लैंगिक इच्छा दाबून ठेवल्याने होणारी त्यांची फरफट.

कदाचित आत्ताच्या काळात जिथे थोड्याफार प्रमाणात कुटुंबियांना प्रायवसी मिळू शकते, तिथे परिस्थिती वेगळी असू शकेल पण 'ऋणानुबंध'ची गोष्ट ज्या काळात बेतली आहे किंवा ज्या आर्थिक सामाजिक स्तरातील लोकांबद्दल आहे त्यांच्यासाठी घरात एक मतिमंदत्व असणारी व्यक्ती असताना स्वतःच्या लैंगिक इच्छा व्यक्त करणं हे नक्कीच अवघड जात असेल. याबाबत कथेमध्ये श्री काटदरे हे एक रॅशनल व्यक्ती म्हणून समोर येतात. कथेत त्यांचं पात्र गोष्टींबाबत स्पष्ट आहे. ते त्यांच्या लैंगिक इच्छांबद्दल त्यांच्या पत्नी समोर स्पष्टपणे बोलू शकतात, देव धर्म करून बच्चू बरा होणार नाही ही गोष्ट त्यांना स्पष्ट आहे. बच्चूच्या इच्छा त्यांना माहिती आहेत. पण त्यांची तर्कसंगत बुद्धी तिथे मार खाते जिथे बच्चू त्यांचं ऐकत नाही किंवा




फोटो गुगलवरून साभार

जेव्हा त्यांना एखाद्या गोष्टीचा राग येतो आणि तो राग ते दुसरीकडे कुठे व्यक्त करू शकत नाहीत. म्हणजे एका प्रसंगात बच्चू त्यांचं ऐकत नाही म्हणून ते स्वतःच्या नशिबाला दोष देत स्वतःला मारून घेतात आणि दुसऱ्या एका प्रसंगात ते बच्चूलाच मारतात. आणि ते केल्याने त्यांना एक प्रकारची गिल्टही येते. या सर्व गोष्टीतून कुठेतरी काटदरेंसारख्या तर्कसंगत विचार करणाऱ्या व्यक्तीवर देखील पुरुष प्रधान संस्कृतीने कसा वार केलाय हे दिसतं का?

दुसऱ्या बाजूला सौ काटदरेंची फरफट ही दोन पायऱ्यांवर होताना दिसते. म्हणजे एका बाजूला त्यांना बच्चूला सांभाळायचंय, घरातली कामं करायचीयेत, आपल्या नवऱ्याची मर्जी सांभाळायचीये आणि दुसऱ्या बाजूला त्यांना संसाराचा गाडाही सांभाळायचाय. अशा वेळी एक स्त्री म्हणून त्या स्वतःला कुणासमोर व्यक्त करणार? मुळातच आपल्या समाजात स्त्रियांना त्यांच्या इच्छा, आकांक्षा... आणि खासकरून त्यांच्या लैंगिक इच्छा उघडपणे व्यक्त करता येत नाहीत आणि त्यात जेव्हा मतिमंदत्व असणारी व्यक्ती घरात असते तेव्हा घरातूनही एक प्रकारचं दडपण येत असतं. त्यामुळे स्त्रियांची फरफट ही आणखी जास्त प्रमाणात होत असते. परंतु नातीगोती मध्ये सौ काटदरेंना त्यांच्या बॉसच्या रूपात एक चांगला मित्र भेटतो, ज्याच्या समोर त्या त्यांची होणारी लैंगिक किंवा इतर प्रकारची फरफट खुलेपणाने बोलू शकतात. आजच्या काळात सुद्धा, जिथे लग्न झालेल्या एखाद्या स्त्रीचे मित्र आहेत असं म्हणल्यावर समाजाचा त्या स्त्रीकडे बघण्याचा जो दृष्टीकोन होतो, तिथे ऋणानुबंध ज्या काळात लिहिली गेली त्या काळात अशा प्रकारची मैत्री दाखवणं हे नक्कीच कौतुकास्पद वाटतं. दुसऱ्या बाजूला सौ काटदरेंना त्यांच्या पतीची फरफट होताना दिसतेय आणि त्या त्यांनाही दुखवू शकत नाहीत. आणि त्यातून ज्या द्विधा मनः स्थितीत त्या अडकलेल्या आहेत, त्या परिस्थितीमधून सर्वच स्त्रिया जात असतात असा विचार एक प्रेक्षक म्हणून आपण करणं आणि त्यांना समजून घेणं आणि त्यांना त्यांच्या व्यक्त होण्यासाठी मार्ग करून देणं हे अत्यंत आवश्यक आहे.

एकुणात काय तर ऋणानुबंध, कच्चा लिंबू किंवा नातीगोती यांसारख्या कादंबऱ्या, चित्रपट किंवा नाटकं यांमधून असे विषय हाताळले गेलेतच परंतु अशा विषयांकडे केवळ मनोरंजनात्मक पातळीवर नं बघता, त्या विषयांवर खोलवर जाऊन विचार होणं गरजेचं आहे आणि त्या विषयाच्या दृष्टीने काहीतरी ठोस पाऊले उचलणं गरजेचं आहे. आणि हे कुणा एका व्यक्तीच्या हातात नाही तर सर्वांनीच तसा विचार करणं गरजेच आहे.

## लैंगिकतेबद्दल का बोलायचे?

तथापि ट्रस्ट

**तरुण आणि प्रौढ मतिमंद मुलांना त्यांच्या वयानुसार अर्थपूर्ण लैंगिक शिक्षण देणं का महत्वाचं आहे?**

१. इतरांना जी माहिती असते ती सर्व माहिती या मुलांनाही देणं गरजेचं आहे.
२. ती तशी असेल तर घर, शाळा, कामाचे ठिकाण आणि त्यांचा परिसर या सर्व ठिकाणी ते अधिक सक्षमपणे वावरू शकतात.
३. लैंगिक शोषण ओळखणे आणि त्या विरुद्ध तक्रार करण्याविषयी प्रशिक्षित आणि सजग असतील तर ते अधिक सुरक्षित राहू शकतील.
४. मुलं जरी बुद्धीने मागे राहिलेली असली तरी त्यांचे शरीर, भावना आणि प्रेरणा त्याच असू शकतात ज्या सामान्य समजल्या जाणाऱ्या मुलांच्या असतात.
५. लैंगिक शिक्षणातून शरीराबद्दलचे वास्तव काय आहे ते समजते ज्यातून अनेक गैरसमज आणि भीती दूर होतात.
६. माणसाच्या आयुष्यात लैंगिकता शिक्षणातून गुणवत्तापूर्ण बदल होतात. सर्वच मुलांना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्यासाठी, नातेसंबंध सांभाळताना आणि एकूणच समाजात वावरताना ही एक महत्वाची गोष्ट आहे.
७. सगळेच मोठे होतात पण निव्वळ वयाने मोठी होण्यापेक्षा आपली मुलं समजेने मोठी होणं अधिक महत्वाचं नाही का!
८. लैंगिकता शिक्षणाची जबाबदारी केवळ इंटरनेट आणि वेबसाईट वर कशाला सोडायची? आपणही पुढाकार घेऊ यात की!
९. टीव्ही, सिनेमे, जाहिराती असू द्या नाही तर दुकानं, मॉल, आपलं सगळ जगंच अत्याधिक लैंगिक झालेलं आहे. अशा वेळी पालक हेच सर्वप्रथम मुलांच्या लैंगिक आणि सामाजिक विकासावर प्रभाव टाकू शकतात.
१०. आणि शेवटी सर्वात महत्वाचे म्हणजे – लैंगिकता हा आपल्या जीवनाचा, आपल्या संस्कृतीचा आणि एकूणच मानवतेचा सहज–स्वाभाविक आणि आनंदी हिस्सा नेहमीच राहिलेला आहे.

# आमंत्रण देणारे रस्ते

- सुजाता लोहकरे

**दैनंदिन व्यवहारातलं स्वावलंबन, प्रेमळ, मनमिळाऊ स्वभाव, थोडाथोडा अभिनय, संगीत, लिहिता वाचता येणं आणि काही मर्यादित व्यावसायिक कौशल्य हे सगळे गुण असले तरी सई स्वतंत्ररित्या जगू शकण्याइतकी स्वावलंबी होऊ शकणार नाही हे वास्तव आहे. म्हणूनच 'आपल्यानंतरची व्यवस्था काय?' या प्रश्नाची केवळ चिंता करत बसण्यापेक्षा काही दिशांचा शोध घेतला आहे, आर्थिक तरतूद केली आहे. अनेक स्वयंसेवी संस्था, पालक संघटनांचे प्रयत्न, शासकीय योजना यांची माहिती घेतो आहोत. सुदैवानं निवडीसाठी पर्याय उपलब्ध आहेत. पण आमच्या पुढचं खरं आव्हान यापेक्षा वेगळंच आहे.**

सईचं पंचविशीनंतरचं आणि आमचं सेवानिवृत्तीनंतरचं एकत्रित आयुष्य कसं असेल याचं एक चित्र आमच्या मनात साकारलेलं आहे. आमचं असं एक कुटुंब असेल ज्यात आम्ही, सई आणि सईसारखी तिच्या आसपासच्या वयाची आणखी काही मुलं असतील. कदाचित आणखी काही पालकही असतील. या मुलांसाठी साधी सोपी प्रक्रिया असलेली काही उत्पादक कामं करता येतील असं एखादं वर्कशॉप असेल. मुलांना हुंदडायला आणि काम करायला छोटंसं शेत किंवा बाग असेल. कला-करमणुकीची साधने असलेली एक स्वतंत्र खोली असेल, एक वाचनालय असेल. ही मुलं तिथं आवडेल, जमेल ती कामं करतील. नाच, गाणी, नाटकं अशा कला मुक्तपणे सादर करतील त्यांचा आस्वाद घेतील. जीवनातले 'सगळे' आनंद एकमेकांना न दुखावता घेतील.

आव्हान आहे ते 'सगळे' या शब्दात अंतर्भूत असलेल्या लैंगिक आनंदाचं. आधीच निसर्गदत्त मर्यादांमुळे माणूस म्हणून जगण्यातल्या कितीतरी आनंदांना पारखी झालेली ही मुलं... त्यांना तहान-भुकेइतक्याच महत्त्वाच्या असलेल्या या गरजेच्या पूर्तीपासून, त्यातल्या आनंदापासून दूर ठेवण्याची व्यवस्था करणं हे आम्हाला क्रूरपणाचं वाटतं. ही काळजीपेक्षा जास्त दांभिकता वाटते. गैरप्रकारांच्या, एकमेकांना दुखावण्याच्या आणि मुली गरोदर वगैरे राहण्याच्या शक्यतांचा व्यवहार्य, दूरगामी विचार करून कुटुंबात निकोप वातावरण राहील अशी व्यवस्था करावी लागेल. त्यांची प्रेमाची भूक भागायला हवी आणि त्यांना निर्व्याज प्रेम करण्यासाठी हक्काच्या सोबतीसाठी, आधारासाठी, एका पातळीवर येऊन करायच्या शेअरिंगसाठी स्वत:चं असं हक्काचं माणूस मिळायला हवं. लग्नामुळे येणाऱ्या इतर अनेक जबाबदाऱ्या त्यांना पेलता येणार नाहीत हे वास्तव स्वीकारून धार्मिक, नैतिक किंवा कायदेशीररित्याही त्यांना लग्नाच्या बंधनात अडकवण्याची गरज आहे असं आम्हांला वाटत नाही. त्यांना सहजीवनाचा आनंद घेता यावा हा मुख्य हेतू आहे. शारीरिक संबंध हा त्या सहजीवनाचा केवळ एक भाग असू शकेल. तेही मुलांच्या इच्छा, गरजा व त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार ठरेल. शारीरिक संबंधाच्या अवतीभवतीचे, एकमेकांची काळजी घेण्यातले, हक्काने स्पर्श करण्यातले, दुखल्याखुपल्यावेळी जवळ असण्यातले, एकमेकांसाठी छोट्याछोट्या गोष्टी करण्यातले आणि वाद घालण्यातलेही आनंद या कुटुंबात मुलांना मिळायला हवेत. अर्थात त्यांची काळजी घेण्यासाठी, व्यवस्था पाहण्यासाठी असलेल्या विचारी माणसांनी याही बाबतीत त्यांना कुठं, किती, कशी मदत करायची, किती काळजी घ्यायची हे परिस्थितीनुसार लवचिक राहून ठरवायला लागेल. मात्र त्यासाठी नीती-अनीतीच्या पारंपरिक कल्पना, त्यातली दांभिकता बाजूला ठेवून मोकळ्या मनानं मुलांच्या या सहजीवनासाठी प्रयत्न करायला हवेत. आणि त्यासाठी अशी तयारी असणाऱ्या समविचारी पालकांची सोबतही हवी आहे.

या निर्णयापर्यंत येण्याच्या वाटेवर आम्हांलाही खूप संघर्ष करावा लागला आहे. केवळ समाजातल्या, घरातल्या, आप्तेष्टांमधल्या एरवी आदरणीय असलेल्या बुजुर्गांशीच नव्हे तर आमच्यावर झालेल्या नीतीअनीतीच्या पारंपरिक संस्कारांशीही. या संघर्षाची सुरुवात सई अगदी लहान असतानाच झाली होती. तीनेक वर्षांची ही पोर एकदा चड्डी न घालता आतल्या खोलीतून बैठकीच्या खोलीत आली. तेव्हा त्यासाठी तिच्यावर ओरडणारी आमच्या घरातली माणसं ही समाजाच्या एका दृष्टिकोनाचंच प्रतिनिधित्व करीत होती. लहानग्या निरागस मुलीचं नागडेपणही स्वच्छ दृष्टीनं बघू न शकणारी ही कसली नीती? कुणी ठरवली? का? हे प्रश्न त्या वेळीही पडले होतेच.

ती जसजशी मोठी होत गेली तसतशी तिची कमी असलेली उंची आणि गुबगुबीत शरीरयष्टी यामुळं तिचं वेगळेपण लोकाचं लक्ष वेधून घेणारं ठरायला लागलं. तुमची वयात आलेली मतिमंद मुलगी जी चारचौघांसारखंच वागते पण चारचौघींपेक्षा वेगळी दिसते - तिला घेऊन तुम्ही कुठेही बाहेर जाता तेव्हा तिच्याकडं बघणाऱ्या अनेक 'अर्थपूर्ण' नजरांशी तुम्हाला लढावंच लागतं. तुम्ही लाख

स्वीकारलेल्या असतात तिच्या मर्यादा, जाणून आणि जपून असता तुम्ही तिच्यातली निरागसता, स्वच्छ माणूसपण; मनाचं मोठेपण, तुमच्यासाठी लाखमोलाची असते तिची निर्व्याज, निस्वार्थी प्रेम करण्याची ताकद - पण हे सगळं तुम्ही प्रत्येकाला नाही ना सांगू शकत? शिवाय ही 'असं' बघणारी सगळी माणसं वाईट थोडीच असतात. काहीही वेगळं दिसलं की तिकडे लक्ष जाणं स्वाभाविकच नाही का?... मग कुणाला कणव येणार, कुणाला दया, कुणाला हसू येणार, कुणाला वाईट वाटणार, ते त्यांच्या चेहेऱ्यावर दिसणार आणि तुमचं तथाकथित संवेदनशील मन ते टिपणार... कितीही वर्षं गेली तरी तुम्हाला त्या गोष्टींची सवय होणार नाही, तुम्ही या नजरांना सरावणार, निर्ढावणार नाही... आणि तिला बाहेर नेण्याचं तर अजिबातच सोडणार नाही... मग संघर्ष अटळ असणारच ! आपल्याला असं मूल असल्याचा धक्का, निराशा, नशीब वगैरेतून येणाऱ्या नकारात्मक भावनांवर, दुःखावर विजय मिळवलेला असतो तुम्ही; तरी या नजरांचा, स्वाभाविक म्हणून सहज स्वीकार करण्यासाठी आतला लढा अजून चालूच आहे.



आमचं हे आधीच वेगळं असलेलं मूल, त्यातून ती मुलगी ! स्वतःच्या आयुष्यात 'माणूस' म्हणून जगण्यासाठी बाई म्हणून केलेला संघर्ष, त्यातून अधिकच तिखट झालेली माणूसपणाची धार या साऱ्यामुळं सईसाठीचा हा संघर्ष अनेक पटींनी आणि अनेक बाजूंनी टोकदार होतो आहे.

निसर्गनियमानुसार वयाच्या तेराव्या वर्षी सईची मासिक पाळी सुरू झाली. यात काहीही विशेष वेगळं घडलेलं नाही याच भावनेनं, सहजतेनं मी त्यावेळी तिला सांगितल, ''जसं आपल्या शरीरातून आपल्याला नको असलेली शी, शू आपण बाहेर टाकतो, तसं हे पण नको असलेलं रक्त असतं. ते महिनाभर पोटातल्या एका पिशवीत साठत असतं आणि महिन्यातून एकदा बाहेर पडतं. असं सगळ्याच मोठ्या मुलींना आणि बायकांना होतं. त्यामुळं पोटातली ती पिशवी स्वच्छ होते आणि थोडंसं पोट दुखलं तरी नंतर आपल्याला छान वाटतं.'' यावर तिचे काही प्रश्न होते, ''हे तुला पण होतं? सलोनीला पण होणार? आणि बाबाला?'' यांची मी सहजपणे दिलेली उत्तरं ऐकून ती समजुतीनं हसली होती. त्यानंतर स्वच्छतेसाठीच्या आवश्यक गोष्टी एकदाच करून दाखवल्या, हे असं का करायचं यावर पण बोलणं झालं आणि त्यानंतर आत्तापर्यंत मला तिला याबद्दल काहीही सांगावं लागलेलं नाही. नवीन पॅड योग्य वेळी व्यवस्थित घेणं, वापरलेलं पॅड कागदात गुंडाळून कचऱ्याच्या डब्यात टाकणं या गोष्टी ती अत्यंत जबाबदारीने करते. पॅडसचा स्टॉक संपत आला की लगेच बाबाला सहजपणे त्याची आठवण करून देते. याबाबतीत एकदा आठ-नऊ वर्षांच्या सलोनीने तिला काहीतरी विचारलं - तर मी तिला जे जे सांगितलं होतं ती पूर्ण कॅसेट माझ्याच सुरात रिवांईड झाली होती - तेवढ्याच सहजतेनं !

**क्रमश:**

**(उर्वरित भाग पुढील अंकात)**

*(सुविद्या प्रकाशन तर्फे प्रकाशित 'मर्यादांच्या अंगणात वाढताना' या पुस्तकातून साभार!)*

## वाचकांचा प्रतिसाद

नुकताच तिसरा अंक मिळाला. खूपच छान आहे आणि अतिशय सुंदर माहिती आहे. मी सर्व शाळांना व पालकांना वर्गणीदार होण्याबाबत पालक मेळाव्यात सांगणार आहे.

**-यतिन अहीरे, सिंधुदुर्ग**

सुजाताताई आणि अरुणभाऊ हे सईचे आई-बाबा. तुमच्यापैकी अनेकांना हे नाव ओळखीचे किंवा अगदी या व्यक्तीही परिचयाच्या असतील. तसंच त्यांचं 'मर्यादांच्या अंगणात वाढताना' हे पुस्तकही तुमच्यापैकी काहींच्या चांगल्याच परिचयाचे असेल. ज्यांच्या परिचयाचे नाही त्यांच्यासाठी ह्या पुस्तकाची माहिती इथे देत आहोत. हे पुस्तक तसे जुने, मागच्या दशकातले. विशेष मुलांच्या पालकांनी आणि अर्थातच प्रत्येक विचारी सुज्ञ व्यक्तीने वाचायलाच हवे असे हे पुस्तक आहे. तथापिच्या 'मतिमंदत्व आणि लैंगिकता' या विषयाच्या एका कार्यशाळेच्या निमित्ताने हे पुस्तक आणि या दाम्पत्याविषयी दोन ते तीन वर्षांपूर्वीच माहिती मिळाली होती, मध्यंतरी एकदा अगदी ओझरती अशी सुजाताताई यांची भेटही झाली परंतू अधिक नाही. आज या अंकाच्या रूपाने परत हे पुस्तक वाचायला मिळाले. या अंकात पुस्तकातीलच एक प्रकरण खास आपल्या पालक मित्रांसाठी 'पालकांचे अनुभव' या सदरात देत आहोत.

# मर्यादांच्या अंगणात वाढताना..

सुजाता लोहकरे
अरुण लोहकरे

मतीमंद बाळाचा जन्म आणि तिचा स्वीकार, तिच्या सोबत वाढताना आलेले कडू-गोड परंतु समृद्ध करणारे अनुभव आणि त्या अनुभवांनी त्यांचा स्वतःचा माणूस म्हणून केलेला विकास हा सर्व प्रवास हे पुस्तक वाचताना आपल्या सर्वांच्या डोळ्यासमोर तरळून जातो. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, 'ती जन्मतःच मतीमंद आहे हे समजल्यावर आणि पहिल्या स्वाभाविक प्रतिक्रियेची लाट ओसरल्यावर आम्ही हे सत्य स्वीकारलं- आव्हान म्हणून घेतलं. तिच्या वेगळेपणाचं स्वरूप आणि वाढविकासाच्या शक्यता, त्यासाठीचे उपाय याची माहिती मिळवण्यासाठी डॉक्टर, पुस्तकं, वेगळ्या मुलांचे पालक, स्वयंसेवी संस्था असे अनेक स्त्रोत धुंडाळले. सल्ले अनेकांचे घेतले पण ते डोळसपणे, विचार-विवेकाच्या कसोटीवर तपासून स्वीकारले आणि सईच्या विकासासाठी धडपडत राहिलो. आज ती आहे त्या मर्यादांसह आनंदात जगते आहेच पण या धडपडीतून आम्हीही खूप शिकलो. लग्न करताना स्वतःच्या आयुष्याची काही स्वप्ने होती. त्यांचे संदर्भ सईच्या जन्मानं बदलले पण माणूस म्हणून, आईबाप म्हणून वाढत, विकसतच राहिलो.'

पालक मित्रांनो, लोहकरे दाम्पत्याप्रमाणेच तुम्हीही या सर्व आव्हानांचा सामना केला असेल, करत असाल. आपल्या सहप्रवाशाच्या अनुभवाची शिदोरी पांथस्थाला फार मोलाची असते. त्यांना लागलेल्या ठेचा किंवा त्यांना लाभलेले मदतीचे हात आणि विशेष म्हणजे त्यांचे अंगभूत धैर्य आपलाही प्रवास अधिक सहज आणि आनंददायी करते. ते पुस्तकाच्या मनोगताच्या शेवटी लिहितात की, 'एकुणात या प्रवासानं भलेपणावरचा विश्वास, आयुष्यात कोणत्या न कोणत्या कारणांनी संघर्ष करीत असलेल्या माणसांपर्यंत पोचवणं ही आमची जबाबदारी आहे असं आम्हाला वाटतं. आपलं वेगळ असलेलं मूल समजून स्वीकारण्यात आणि त्याच्याबरोबर वाढण्यात आनंद आहे, या आमच्या समजुतीचा एखादा तरी धागा वाचकांच्या मनातल्या पालकत्वाशी जुळेल आणि ही एका प्रश्नापाशी सुरु झालेली कहाणी अनेक उत्तरांच्या दिशा दाखवत सुफळ संपूर्ण होईल, असा विश्वास वाटतो.'




पुस्तकाची प्रत हवी असल्यास किंवा लेखकांशी संवाद साधायाचा असल्यास खालील क्रमांकावर संपर्क करता येईल.

**मर्यादांच्या अंगणात वाढताना..**
सुजाता लोहकरे, अरुण लोहकरे
३/ए-२, कमलनयनम, तिरूपती नगर,
वारजे नाका, पुणे - ४११ ०५८
मोबाईल : ९९२२४४२०६५/९९२२४४६१६५
सुविद्या प्रकाशन, सोलापूर



हितगुज
मतिमंदत्व आणि लैंगिकतेच्या विविध पैलूंचे...
अंक चौथा
एप्रिल-मे २०१८

• संपादक मंडळ •
कलिका मुजूमदार, मेधा टेंगशे, मेघना जोशी,
मेधा काळे, अच्युत बोरगांवकर
नयना डोळस, सुषमा खराडे

सहाय्य : श्रीमती विमलाबाई (जीजी) नीलकंठ जटार ट्रस्ट
मांडणी व मुद्रण : संस्कृती डिझायनर्स

तथापि
स्त्रिया आणि आरोग्य संसाधन संवर्धन

तथापि ट्रस्ट, फ्लॅट क्र. १, ७३,
संगम सोसायटी, बिबवेवाडी, सातारा रोड, पुणे ४११०३७
फोन : ८२३७०२४८४९, ७७२००२१४९९
ईमेल : tathapi@gmail.com
वेबसाईट : www.tathapi.org
letstalksexuality.com

PRINTED MATTER

बुक पोस्ट

अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही.
अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर करता येईल.

खाजगी वितरणासाठी